**ठळक बातम्या**

- संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना देशाची श्रद्धांजली

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून ३ देशांच्या दौऱ्यावर

- नक्षलवादाचा बीमोड करण्याच्या दृष्टीनं आज केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली छत्तीसगड मधे महत्त्वपूर्ण बैठक

- महाराष्ट्रात रस्ते विकासाकरता दीड लाख कोटी रुपये मंजूर/ हे काम पुढच्या तीन महिन्यात सुरू होईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्र्यांचं आश्वासन

आणि

- लोकसभेचे माजी सभापती आणि माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

संसदेवर दहशतवादी हल्ला झाल्याला आज २४ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त या हल्ल्यात शहीद झालेल्यांना देश श्रद्धांजली वाहत आहे. २००१ मध्ये झालेल्या या हल्ल्यात संसदेचं रक्षण करताना हौतात्म्य पत्करलेल्या सुरक्षा रक्षकांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्रद्धांजली वाहिली असून या शूरवीरांनी दाखवलेलं धैर्य, साहस आणि समर्पणाला राष्ट्र अभिवादन करत आहे, त्यांची कर्तव्यनिष्ठा देशाच्या राष्टभावनेला सदैव मार्गदर्शन करत राहील, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, जितेंद्र सिंह आणि इतर नेत्यांनी आज संसद भवन परिसरात शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि इतर संसद सदस्यांनीही हुतात्म्यांना पुष्पांजली वाहिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनीही शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते, जॉर्डनचे राजे अब्दुल्ला बिन अल हुसेन यांच्या निमंत्रणावरून येत्या 15 ते 16 डिसेंबर दरम्यान जॉर्डनला भेट देतील. भारत हा जॉर्डनचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. तर 16 ते 18 डिसेंबर दरम्यान मोदी आधी  इथिओपियाला आणि नंतर ओमानला भेट देणार आहेत.

<><><><>

युद्ध आणि युद्धाचं तंत्र एका मोठ्या क्रांतीच्या उंबरठ्यावर असून भारतीय संरक्षण दल या बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्यासह नवीन सुधारणा आत्मसात करण्यासाठी सज्ज आहे, असं संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. हैद्राबाद मध्ये आयोजित सामायिक दीक्षांत संचलन कार्यक्रमाला ते आज संबोधित करत होते. मजबूत संस्था, स्थिर लोकशाही आणि आपल्या सशस्त्र दलांची दृढ  व्यावसायिकता ही भारतीय सैन्याची बलस्थानं आहेत, असं ते म्हणाले.   ऑपरेशन सिंदूरची तीव्रता जरी कमी झाली असली तरी ते अद्याप सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज छत्तीसगढ मध्ये रायपूर इथं महत्त्वपूर्ण बैठक घेणार असून नक्षलवादाचं उच्चाटन करण्याच्या दृष्टीनं सुरु असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणार आहेत. या बैठकीला छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, उपमुख्यमंत्री विजय शर्मा आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यांनतर अमित शाह बस्तर ऑलिंपिकच्या सांगता समारंभात देखील सहभागी होणार आहेत.

<><><><>

कोळसा खाणींच्या लिलावासाठी तयार केलेल्या  कोलसेतू धोरणाला केंद्रीय मंत्रिमंडळानं  मंजुरी दिली आहे. विविध प्रकारचे उद्योग आणि निर्यातीसाठी कोळसाचा वापर करताना पारदर्शक यंत्रणा असावी आणि उपलब्ध साधनसुविधांना पुरेपूर वापर व्हावा असा या धोरणाचा उद्देश असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं.

आगामी जनगणनेसाठी ११ हजार ७१८ कोटींची तरतूद, तसंच खोबऱ्यासाठी किमान हमी भावालाही केंद्रीय मंत्रीमं्डळाची मंजुरी मिळाली.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेदरम्यान आई-वडील, नातेवाईकांच्या नावांच्या आधारे मतदारांची ओळख पटवताना २००२ च्या मतदार यादीत अनेक त्रुटी आढळून आल्या. विशेष सखोल पुनरिक्षणाचा पहिला टप्पा संपला असला तरी निवडणूक आयोग सातत्यानं याद्यांची पडताळणी करत आहे.

८५ लाख १ हजार ४८६ मतदारांच्या वडिलांचे नाव चुकीचे असल्याचे आढळले. हे प्रमाण एकूण मतदारांच्या ११ पूर्णांक ९ दशांश टक्के आहे. आई-वडिल आणि मुलांच्या वयातल्या अंतरात मोठी तफावत आढळून येण्याचं प्रमाणही खूप आहे. वय ४५ वर्षांहून अधिक असूनही नवे मतदार अशी नोंद केलेल्या मतदारांची संख्या २० लाख ७४ हजार २५६ आहे. तर १३ लाख ४६ हजार ९१८ मतदारांच्या लिंगविषयक माहितीत त्रुटी आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामासाठी दीड लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. हे काम पुढल्या तीन महिन्यात सुरू होईल, असं ते म्हणाले. विधानपरिषदेच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते आज नागपुरात विधानभवन परिसरात गेले होते, त्यावेळी त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ १६ हजार ३१८ कोटी रुपयांचा पुणे ते संभाजीनगर महामार्ग बांधणार असून यासाठीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. या मार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगरमधलं अंतर दोन तासांनी तसंच नागपूर ते छत्रपती संभाजीनगरमधलं अंतर अडीच तासांनी कमी होईल, असं गडकरी म्हणाले. त्याचप्रमाणे सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला समांतर असणाऱ्या १५ हजार कोटी रुपये खर्चाच्या द्रुतगती मार्गामुळे दोन्ही शहरातलं अंतर दीड तासांनी कमी होईल, असंही गडकरी यांनी सांगितलं. ४ हजार २०७ कोटी रुपयांच्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाचं भूमिपूजन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपल्यानंतर केलं जाईल, पुणे विभागातल्या ५० हजार कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली असून पुढल्या तीन महिन्यात हे कामही सुरू होईल, असं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर आज लातूरच्या वरवंटी इथल्या त्यांच्या शेतात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आज सकाळी लातूरमधल्या निवासस्थानापासून त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार अशोक चव्हाण, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह इतर अनेक नेत्यांनी शिवराज पाटील यांचं अंत्यदर्शन घेतलं.

**<><><><><>**

भारतातून आयात होणाऱ्या मालावर ५० टक्के पर्यंत आयात शुल्क लागू करण्याचा अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय बदलण्याचा प्रस्ताव अमेरिकेच्या संसदेत मांडण्यात आला आहे. देबोरा रॉस, मार्क व्हेसी आणि राजा कृष्णमूर्ती या तीन संसदसदस्यांनी मांडलेल्या या ठरावात हा निर्णय बेकायदेशीर असून अमेरिकेतल्या ग्राहक, कामगार वर्गाच्या हिताविरोधातला असल्याचं म्हटलं आहे.

दरम्यान, आयातशुल्क वाढवण्याच्या निर्णयामुळे अमेरिकेची व्यापारी तूट ३५ टक्के कमी झाली असून गेल्या ५ वर्षातला हा नीचांक असल्याचं व्हाईट हाऊस सूत्रांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

विख्यात फुटबॉलपटू लिओनल मेस्सी १४ वर्षांनंतर खासगी दौऱ्याच्या निमित्तानं भारतभेटीवर आला आहे. कोलकाता विमानतळावर आज पहाटे चाहत्यांनी त्याला पाहण्यासाठी गर्दी केली होती. कोलकात्यात लेक टाऊन इथं त्याच्या सन्मानार्थ ७० फुटी पुतळा उभारला आहे. आपल्या तीन दिवसांच्या भारतभेटीदरम्यान मेस्सी हैदराबाद, मुंबई आणि नवी दिल्लीला भेट देणार आहे.

सकाळी कोलकात्यातल्या सॉल्ट लेक मैदानावर हजारो चाहत्यांना मेस्सीनं हात उंचावून अभिवादन केलं. पण त्या अल्पकाळच्या अभिवादनाने समाधान न झालेले चाहते नाराज झाले. आणि त्यांनी मैदानाच्या दिशेनं रिकाम्या बाटल्या, खुर्च्या भिरकावल्या. यामुळे तिथे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.

**<><><><><>**

दुबई येथे काल झालेल्या 19 वर्षांखालील युवकांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात भारताने संयुक्त अरब अमिरातीचा 234 धावांनी पराभव केला. 434 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, संयुक्त अरब अमिरातीचा संघ 50 षटकांत 7 गडी गमावून 199 धावा करू शकला. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या वैभव सूर्यवंशीने अवघ्या 95 चेंडूंमध्ये शानदार 171 धावांची खेळी केली. भारताचा पुढील सामना उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

<><><><><>

देशाच्या विविध भागात थंडीचा कडाका वाढला आहे.
उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि उत्तर भरतात इतरत्र किमान तापमानाचे नीचांक नोंदले गेले आहेत. दक्षिणेतही कर्नाटकच्या उत्तर भागात, तसंच छत्तीसगड, तेलंगण, दक्षिण कर्नाटक, आणि ओदिशा मधे आज थंडीची लाट राहील असा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//